पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक ०९/०६/२०१८

## गडचिरोली पोलीस दलातर्फे एव्हरेस्ट सर करणा-या पाच वीरांचा गौरव

दिनांक १६ मे २०१८ रोजी महाराष्ट्रातील चंद्रपुर जिल्हयातील छोटयाश्या गावातील ०५ मुलांनी एव्हरेस्ट शिखर सर करून महाराष्ट्राचे नाव जगाच्या कानाकोप-यात नेले होते. या पाचही जणांचा सन्मान सोहळा आज पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) डॉ. महेश्वर रेड्डी , अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. हरि बालाजी, अपर पोलीस अधिक्षक (नक्षलसेल) महेंद्र पंडीत यांच्या उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरवातीस एव्हरेस्टवीर मनिषा धुर्वे हिच्या हस्ते वीर क्रांतीकारी बिरसा मुंडा यांच्या ११८ व्या पुण्यतिथी निमीत्ताने त्यांच्या पतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले. यानंतर एव्हरेस्ट सर करणा-या मनिषा धुर्वे, उमाकांत मडावी, कविदास काठमोडे, प्रमेश आडे, विकास सोयाम त्याच बरोबर एव्हरेस्ट चढाई करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणा-या बिमला नेगी, विस्तार प्रकल्प अधिकारी सुधाकर काकडे , शामराव काकडे, व मनिषा धुर्वे यांचे वडील धर्मा धुर्वे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी भावना व्यक्त करतांना या एव्हरेस्ट विरांनी आपल्या भारताचा झेंडा जेव्हा एव्हरेस्टवर फडकविला तेंव्हा आपले जीवन सार्थकी झाल्याचे सांगीतले. प्रशिक्षक नेगी यांनी एव्हरेस्टवर चढाई करतांना राबविलेल्या ‘मिशन शौर्य-२०१८’ बाबत विध्यार्थ्यांच्या निवडी पासुन ते एव्हरेस्ट शिखर सर करण्यापर्यंतचा प्रवास सर्वांसमोर मांडला यामध्ये विध्यार्थांना काय अडचणी आल्या व त्यांनी त्यावर कशी मात केली हे आपल्या मनोगतातुन त्यांनी व्यक्त केले.

यावेळी मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली डॉ.अभिनव देशमुख सर यांनी संपुर्ण टिमचे अभिनंदन करत भविष्यात देखील त्यांच्या कडून अश्याच प्रकारे कामगिरीची अपेक्षा व्यक्त करत गडचिरोलीतील विध्यार्थ्यांसमोर हा एक आदर्श असुन त्यांनी देखील पुढे येवुन गडचिरोलीचे नाव देशाच्या कानाकोप-यात न्यावे. अशी भावना उपस्थित विध्यार्थी व पोलीस यांच्या समोर व्यक्त केल्या. यावेळी उपस्थितांना नेगी यांनी‘ मिशन शौर्य -२०१८’ बाबतचा अंगावर शहारे आणणारा व्हिडीओ उपस्थितांना दाखविला.